# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

फोन नं.(०२०) २६०५०६४१

ई-मेल आयडी :- comscea.pune@maharashtra.gov.in
secscea.pune@maharashtra.gov.in


जा.क्र.रासनिप्रा/मतपेटी मंजुरी आदेश/सन २०१४/683 दि.०५/११/२०१४

**वाचावे :**१. महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ अधिसुचना दिनांक ११ सप्टेंबर २०१४ नियम ३४

**प्रस्तावना :-**

ज्या अर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या दि.१३ ऑगस्ट २०१३ च्या (सुधारणा) अधिनियमातील कलम ७३ कब नुसार ३०/०३/२०१३ रोजी सहकारी निवडणूक प्राधिकरणाचे गठण करण्यात आले आहे. कलम ७३ कब अन्वये राज्यातील सर्व सहकारी संस्थांच्या निवडणूका राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणामार्फत घेण्याची तरतुद करण्यात आलेली आहे. आणि,

ज्या अर्थी, वाचावे क्र.१ मधील तरतुदीनुसार नियम ३४ मध्ये असे नमुद आहे की प्रत्येक मतपेटी किंवा इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र हे राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाकडून मान्यता देण्यात येईल अशा स्वरुपाची असेल, आणि,

ज्या अर्थी, मतपेटी किंवा इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र ही राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाकडुन मान्यता देण्यात येईल अशी तरतुद असल्यामुळे राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणामार्फत सहकारी संस्थांच्या निवडणूका घेण्यासाठी मतपेटी चे स्वरुप ठरवुन त्यास मान्यता देणे आवश्यक आहे,आणि,

त्या अर्थी, या आदेशान्वये मतपेटीचे स्वरुप ठरवून देणे बाबत राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणास प्राप्त् अधिकारानुसार पुढील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ मधील नियम ३४ नुसार राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण ,महाराष्ट्र राज्य पुणे. यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार पुढील प्रमाणे मतपेटीच्या सर्वसाधारण स्वरुपास मान्यता देण्यात येत आहे.

१. मतपेटी चे स्वरुप = लांबी १ फुट X रुंदी १फुट X उंची १.५ फुट

२. मतपेटी वरील बाजुस झाकण असेल व त्यास कडी कोयंडा बसविलेला असेल, जेणे करुन त्यास कुलुपाव्दारे बंद करण्याची सोय असेल.

३. मतपेटी वरील बाजुस मतपत्रिका पेटीत टाकण्यासाठी छोटया आयता कृती आकाराचे फट असेल. मात्र सदर फट ही कोणत्याही परिस्थितीत त्यातून मतपत्रिका बाहेर काढता येणार नाही एवढी मोठी नसेल.

**मात्र स्थानिक परिस्थितीनुसार उमेदवारांची संख्या कमी जास्त असल्यास वरील प्रमाणे मतदान पेटीच्या आकारमानात बदल करण्याचा अधिकार जिल्हा/तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक निर्णय अधिकारी (DCEO/TCEO/WCEO) यांच्या सल्लयाने निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना राहील.**

**मा.आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण यांचे निर्देशानुसार.**

**( डॉ.ए.बी.जोगदंड )**
**सचिव**
**राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण**
**महाराष्ट्र राज्य,पुणे.**

**प्रति,**
संबंधीत जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी (सर्व)
संबंधित तालुका / प्रभाग सहाय्यक निबंधकअधिकारी (सर्व)

**प्रत माहितीस्तव :**

१. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)

**प्रत माहितीस्तव सस्नेह रवाना :**

१. मा.सचिव, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
२. मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
३. मा.आयुक्त (साखर), साखर संचालनालय, साखर संकुल, पुणे
४. मा.आयुक्त (दुग्धविकास), अब्दुल गफारखान मार्ग, वरळी सी-फेस , वरळी मुंबई
५. मा.संचालक, हातमाग, यंत्रमाग व वस्त्रोद्योग, नागपूर.